ePaper
वर्ष - 8 । अंक - 318 | UDYAM-MH-26-0158827

# बबनराव लोणीकरांच्या वादग्रस्त वक्तव्यावर मुख्यमंत्र्यांची स्पष्ट भूमिका



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- गोलंदाजांना पाठिंबा गरजेचा!
- रोहित शर्मा तर भलताच रोमँटिक!
- ४१ वर्षांनी भारत पुन्हा अवकाशात!
- संरक्षण खर्चवाढीस मान्यता


www.mahaenews.com । शुक्रवार, दि. 27 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## फक्त हिंदीविरोधी अजेंडा : राजकीय पक्षाचा नको झेंडा!, हिंदीविरोधी आरोळी, ठाकरे बंधूंची टाळी?

# ठाकरे बंधूंचा मोर्चा, मनोमीलनाची चर्चा!

## हिंदी सक्तीविरोधात मनसे आणि उबाठा गट आक्रमक ; दि. 5 जुलै रोजी येणार एकत्र ?

। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज

**हिंदीच्या संभाव्य सक्तीविरोधात वातावरण चांगलेच तापले असून उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. कोणत्याही परिस्थितीत हिंदीची सक्ती खपवून घेतली जाणार नाही, आम्ही ती उधळून लावू, असे इशारे दोघांनीही दिले आहेत. हिंदीला विरोध करण्यासाठी दि. ५ जुलै रोजी 'मनसे' चा भव्य मोर्चा निघणार असून त्यात उद्धव ठाकरे यांची शिवसेनाही सहभागी होण्याची शक्यता आहे. या मोर्चाच्या माध्यमातून ठाकरे बंधूंच्या मनोमीलनाची शक्यताही वर्तवण्यात येत आहे.**






### नो झेंडा, ओन्ली अजेंडा !

मनसेने आयोजित केलेल्या या मोर्चामध्ये मराठी प्रेमी तसेच समविचारी सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन राज ठाकरे यांनी केले आहे. हिंदीविरोधी अजेंडा असून कोणीही आपल्या पक्षाचा झेंडा आणू नये, असे ते म्हणाले.

### राज ठाकरे यांचा इशारा..

राज ठाकरे यांच्या 'मनसे' सोबत उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेकडून देखील हिंदीला विरोध करण्यात येत आहे, त्यामुळे या सर्वपक्षीय मोर्चात कोण कोण सहभागी होणार आणि कोण होणार नाही तेही मला बघायचे आहे, असा इशारा राज ठाकरे यांनी दिल्यामुळे अनेकांचे धाबे दणाणले आहे.

### हिंदू आहोत, हिंदी सक्ती नको

ठाकरे बंधूंनी पत्रकार परिषदा घेत हिंदीसंदर्भातील पक्षाची भूमिका स्पष्ट केली आहे. महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी शिकवू देणार नसल्याचा इशारा ठाकरे बंधूंनी दिला आहे. तर मतांसाठी ठाकरे बंधूंकडून 'फेक नॅरेटिव्ह' सेट केला जात असल्याचा आरोप सत्ताधाऱ्यांकडून विशेषतः भाजपाकडून करण्यात आला आहे.

### पहिलीपासून हिंदी : नाहीच नाही !

नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी शिकवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, या हिंदी सक्तीविरोधात ठाकरे बंधू मैदानात उतरले आहेत. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंनी पहिलीपासून हिंदी शिकवण्याला कडाडून विरोध केला आहे. महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी नकोच म्हणत उद्धव ठाकरेंनी राज्य सरकारला इशारा दिला आहे. तर राज ठाकरे देखील दि. ५ जुलैला हिंदीविरोधात मोर्चा काढणार आहेत. हा मोर्चा सर्वपक्षीय असून मराठी माणूस या मोर्चाचे प्रतिनिधित्व करणार असल्याचे म्हणत राज ठाकरेंनी सरकारला आव्हान दिले आहे.

### राज, उद्धव यांच्याशी बोलणार?

दरम्यान, या मोर्चात सहभागी होण्यासाठी राज ठाकरे हे उद्धव ठाकरेंसोबत देखील बोलणार आहेत. महाराष्ट्राच्या हितासाठी छोटी-मोठी भांडणे दूर ठेवण्यासाठी तयार असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले होते. या संदर्भातील चित्र तुम्हाला मोर्चात पाहायला मिळणार असल्याचे सूचक वक्तव्य देखील राज ठाकरे यांनी केले आहे. दुसरीकडे, हिंदीविरोधातील लढ्यात उतरण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी देखील मराठी माणसांना आवाहन केले आहे.

### बावनकुळे यांची टीका..

खोटा नॅरेटिव्ह सेट करण्यासाठी मराठी भाषेला विरोध असे भासवले जात आहे. हिंदी भाषा ही ऐच्छिक भाषा आहे, हे वेळोवेळी सांगून देखील केवळ राजकारणासाठी पत्रकार परिषदा आणि मोर्चाचे आयोजन करण्यात आल्याचा आरोप भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे.

### हिंदीसक्ती उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असतानाची!

हिंदी सक्तीवरुन 'खोटे कथानक' तयार करण्याचा प्रयत्न केला जात आहे. डॉ.रघुनाथ माशेलकर समितीने तयार केलेला 'इयत्ता पहिली ते बारावीपर्यंत मराठी, इंग्रजी व हिंदी या तीन भाषा सक्तीने शिकवल्या पाहिजेत' हा अहवाल ठाकरे यांच्या मंत्रिमंडळाने स्वीकारला होता, अशी आठवण मराठी भाषा विकास मंत्री उदय सामंत यांनी करुन दिली आहे.

### मोर्चात सहभागी होण्याचे कलाकार आणि साहित्यिकांना आवाहन..

हिंदी सक्तीविरोधात दि. ५ जुलै रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा भव्य मोर्चा निघणार असून प्रत्येक मराठी प्रेमीने मोर्चाला उपस्थित राहण्याचे आवाहन राज ठाकरे यांनी केले आहे. त्याचप्रमाणे, सर्व मराठी कलाकार आणि साहित्यिक यांनाही आपण आवाहन करत असून सर्वांना तसे पत्र पाठवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. या मोर्चाला कोण कोण उपस्थित राहणार आणि कोण अनुपस्थित राहणार, यावर आपले बारीक लक्ष असेल, असा इशारा राज ठाकरे यांनी दिला आहे.

# ज्ञानेश्वर महाराज पालखीचे प्रस्थान

## नीरा नदीमध्ये माउलींच्या पादुकांना स्नान घालण्यात आले

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आषाढी वारीसाठी पंढरपूरला निघालेल्या संत ज्ञानेश्वर माउलींच्या पालखी रथातील पादुकांना आज पवित्र नीरा नदीत स्नान घालण्यात आले. स्नानानंतर पालखी सोहळ्याने दुपारी तीन वाजता पुणे जिल्ह्याचा निरोप घेऊन सातारा हद्दीत प्रवेश केला.**



दुपारी दोन वाजता टाळ-मृदंगाच्या गजरात दत्त मंदिर घाटाजवळ नीरा नदीमध्ये माउलींच्या पादुकांना विधिपूर्वक स्नान घालण्यात आले. सकाळी सहा वाजता महर्षी वाल्मीकीच्या वाल्हे गावातून पालखी सोहळ्याने लोणंदला जाण्यासाठी प्रस्थान ठेवले. विठू नामाचा गजर करीत पालखी सोहळा दुपारी साडेअकरा वाजता नीरा शिवतक्रार येथे पोहोचला. यावेळी सरपंच तेजश्री काकडे, उपसरपंच राजेश काकडे यांनी स्वागत केले. दुपारी अडीच वाजता भोजन आणि विश्रांती झाल्यावर पालखी सोहळा नीरा स्नानासाठी निघाला.हैबतबाबांचे वंशज राजेंद्र आरफळकर यांनी माउलींच्या चांदीच्या पादुका हातात घेतल्या, त्यांच्या समवेत पालखी सोहळाप्रमुख भावार्थ देखणे, प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ उपस्थित होते. हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत पादुकांना दत्त घाटावर विधियुक्त स्नान घालण्यात आले.पादुका रथामध्ये ठेवल्यावर पूजा झाली. त्यानंतर पालखी रथ पूल ओलांडून सातारा हद्दीजवळ आला. या ठिकाणी पुणे जिल्ह्याच्या वतीने या सोहळ्याला निरोप देण्यासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, अप्पर पोलीस महासंचालक निखिल गुप्ता, पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, प्रांताधिकारी वर्षा लांडगे, तहसीलदार विक्रम रजपूत, उपविभागीय पोलीस अधिकारी तानाजी बरडे आदी उपस्थित होते. पुरंदर तालुक्यात संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचा चार दिवस मुक्काम होता. त्यामुळे वातावरण भक्तिमय झाले होते. संत सोपानदेवांच्या सासवड नगरीत दोन दिवस, जेजुरी आणि वाल्हे येथे प्रत्येकी एक दिवस हा सोहळा मुक्कामी होता. शुक्रवारी माउलींचा मुक्काम लोणंद येथे आहे.दुपारी दोन वाजता टाळ-मृदंगाच्या गजरात दत्त मंदिर घाटाजवळ नीरा नदीमध्ये माउलींच्या पादुकांना विधिपूर्वक स्नान घालण्यात आले. सकाळी सहा वाजता महर्षी वाल्मीकीच्या वाल्हे गावातून पालखी सोहळ्याने लोणंदला जाण्यासाठी प्रस्थान ठेवले. विठू नामाचा गजर करीत पालखी सोहळा दुपारी साडेअकरा वाजता नीरा शिवतक्रार येथे पोहोचला. यावेळी सरपंच तेजश्री काकडे, उपसरपंच राजेश काकडे यांनी स्वागत केले. दुपारी अडीच वाजता भोजन आणि विश्रांती झाल्यावर पालखी सोहळा नीरा स्नानासाठी निघाला.हैबतबाबांचे वंशज राजेंद्र आरफळकर यांनी माउलींच्या चांदीच्या पादुका हातात घेतल्या, त्यांच्या समवेत पालखी सोहळाप्रमुख भावार्थ देखणे, प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ उपस्थित होते. हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत पादुकांना दत्त घाटावर विधियुक्त स्नान घालण्यात आले.पादुका रथामध्ये ठेवल्यावर पूजा झाली.

### विठू नामाचा गजर

त्यानंतर पालखी रथ पूल ओलांडून सातारा हद्दीजवळ आला. या ठिकाणी पुणे जिल्ह्याच्या वतीने या सोहळ्याला निरोप देण्यासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, अप्पर पोलीस महासंचालक निखिल गुप्ता, पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, प्रांताधिकारी वर्षा लांडगे, तहसीलदार विक्रम रजपूत, उपविभागीय पोलीस अधिकारी तानाजी बरडे आदी उपस्थित होते.पुरंदर तालुक्यात संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचा चार दिवस मुक्काम होता. त्यामुळे वातावरण भक्तिमय झाले होते. संत सोपानदेवांच्या सासवड नगरीत दोन दिवस, जेजुरी आणि वाल्हे येथे प्रत्येकी एक दिवस हा सोहळा मुक्कामी होता.

# एकमजली घराला चार मजल्यांचा कर!

## मिळकतकर विभागाचा अजब कारभार, साडेसतरा लाख न भरल्यास जप्ती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**एकमजली बांधकामाला महापालिकेने चार मजल्यांचा मिळकतकर आकारण्याचा अजब कारभार केला आहे. हा मिळकतकर आता ४३ लाखांच्या घरात गेला आहे. घरमालकाने पाच वर्षे हेलपाटे मारल्यानंतर अखेर करामध्ये दुरुस्ती करण्याची तयारी प्रशासनाने दाखविली. मात्र, त्यासाठी आधी १७ लाख ५० हजार रुपये भरा आणि त्यानंतर मिळकतकरात दुरुस्तीचे बिल घ्या, असा पवित्रा महापालिका प्रशासनाने घेतला आहे. महापालिकेच्या या निर्णयामुळे सुतारकाम करणारा हा जागामालक हतबल झाला आहे.**




मुंढवा भागातील शिर्के रस्त्यावर राहत असलेल्या सुरेश सरवदे यांना महापालिकेने हा साडेसतरा लाख रुपयांचा मिळकतकर भरण्यास सांगितले आहे. या भागात सरवदे यांनी दीड गुंठा जागा विकत घेऊन त्यावर अंदाजे १३०० चौरस फुटांचे बांधकाम केले. हे बांधकाम एक मजल्याचे आहे. या बांधकामाला मिळकतकर लावावा, असा अर्ज सरवदे यांनी महापालिकेकडे केला. त्या वेळी मिळकतकर विभागाने चार मजल्यांच्या बांधकामाची नोंद करून त्यांना मिळकतकराचे बिल पाठविले. हा कर जास्त असल्याने सरवदे यांनी तो भरलाच नाही. त्यानंतर २०१७ मध्ये मिळकतकर न भरल्याने त्यांना महापालिकेने साडेपाच लाख रुपयांचे बिल पाठविले. बांधकाम केवळ एक मजल्याचे असताना चार मजल्यांचे बिल कसे भरू, अशी विचारणा करून जागामालक सरवदे यांनी महापालिकेकडे मिळकतकरात दुरुस्ती करावी, यासाठी अर्ज सादर केला. महापालिकेच्या ढोले पाटील रोड क्षेत्रीय कार्यालयात जाऊन संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला. इतकेच नव्हे, तर संबंधित अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष जागेवर नेऊन त्यांना बांधकामदेखील दाखविले.

### साडेसतरा लाख रुपयांचा मिळकतकर

वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी गुरुवारी तक्रारदार, तसेच त्या विभागातील संबंधित अधिकाऱ्यांना बोलाविण्यात आले आहे. कागदपत्रांची तपासणी करून पुढील निर्णय घेतला जाईल.मुंढवा भागातील शिर्के रस्त्यावर राहत असलेल्या सुरेश सरवदे यांना महापालिकेने हा साडेसतरा लाख रुपयांचा मिळकतकर भरण्यास सांगितले आहे.

त्यानंतर यामध्ये दुरुस्ती करण्याचे आश्वासन संबधित जागामालकाला देण्यात आले होते.तीन महिन्यांपूर्वी ढोले पाटील रोड क्षेत्रीय कार्यालयातील मिळकतकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी ४३ लाख १० हजार ३१२ रुपयांची थकबाकी असून, क्षेत्रफळ दुरुस्ती करून अंदाजे १७ लाख ५० हजार रुपयांचे बिल भरा, त्यानंतर त्यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती करून बिल दिले जाईल, असे पत्र दिले. घराचे संपूर्ण बांधकाम करण्यासाठीही इतका खर्च झाला नाही, तेवढा मिळकत कर भरा, अन्यथा जप्ती येईल, असे महापालिकेतील अधिकारी सांगत असल्याने महापालिकेच्या या कारभारापुढे जागामालक सरवदे हतबल झाले आहेत. या बिलामध्ये दुरुस्ती करून मिळावी, असा अर्ज सरवदे यांनी मिळकतकर विभागाचे उपायुक्त अविनाश सकपाळ यांच्याकडे केला आहे.एका मजल्याच्या घरासाठी चार मजल्यांचा मिळकतकर लावल्याची तक्रार संबंधित व्यक्तिने केली आहे.

## स्वयंसेवी संस्था, लोकप्रतिनिधींची बैठक घ्या

# महापालिका हद्दवाढीबाबत मुख्यमंत्र्यांना साकडे!

### भाजपा आमदार महेश लांडगे यांची मागणी

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दवाढ, तसेच चाकण, आळंदी आणि राजगुरुनगर या नगरपरिषदांचा समावेश करून स्वतंत्र महापालिका स्थापनेबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी आणि शहर विकास क्षेत्रातील तज्ज्ञांसोबत बैठक घ्यावी, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**




यासंदर्भातील अधिकृत पत्र मुख्यमंत्री फडणवीस यांना पाठवले असून, संबंधित भागातील स्वयंसेवी संस्था, स्थानिक लोकप्रतिनिधी, तज्ज्ञ अधिकारी आणि नागरी संघटनांसोबत सविस्तर सल्लामसलत होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

आमदार लांडगे यांनी पत्रात नमूद केले आहे की, हिंजवडी, माण, मारुंजी, जांबे, नेरे, सांगवडे व गहुंजे या सात गावांचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत समावेश करण्यास राज्य सरकारने अनुकूलता दर्शविल्याची माहिती प्रसारमाध्यमांतून समोर आली आहे. आयटी कंपन्यांचा मोठा जमाव, वाढती लोकसंख्या, आणि मुलभूत सुविधांचा अभाव ही स्थिती लक्षात घेता या भागाचा पालिकेत समावेश अत्यावश्यक आहे. तसेच, आयटी कर्मचाऱ्यांच्या वतीने #UnclogHinjawadiITPark ही स्वाक्षरी मोहीम देखील सुरू करण्यात आली असून, हिंजवडी व परिसराच्या समावेशाची मागणी अधिक तीव्र झाली आहे. दुसरीकडे, पिंपरी-चिंचवड महापालिकेने आपल्या अहवालात स्पष्ट केले आहे की, सध्या क्षेत्रफळ वाढल्यामुळे महापालिकेवर सेवा पुरवठ्याचा ताण वाढला आहे. त्यामुळे चाकण, आळंदी व राजगुरुनगर या नगरपरिषदांचा स्वतंत्र महापालिका म्हणून विकास करण्यास हरकत नाही, असे मत महापालिकेने शासनास कळवले आहे. "हा संपूर्ण परिसर PMRDA च्या हद्दीत असून, त्याचे अध्यक्ष म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वात पिंपरी-चिंचवड आणि पुणे परिसर शाश्वत विकासाचे रोल मॉडेल बनू शकतो," असा विश्वासही आमदार लांडगे यांनी व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर, महापालिका हद्दवाढ आणि नवीन महापालिकेच्या स्थापनेबाबत सविस्तर बैठक लवकरच आयोजित व्हावी, अशी नम्र विनंती आमदार लांडगे यांनी आपल्या पत्राद्वारे केली आहे.

> "पिंपरी-चिंचवड परिसराचा झपाट्याने होणारा विस्तार, वाढती लोकसंख्या, आयटी कंपन्यांची वाढती संख्या, आणि नागरिकांच्या मूलभूत गरजांची वाढती मागणी पाहता, नियोजनबद्ध विकासासाठी महापालिका हद्दवाढीचा निर्णय अत्यावश्यक आहे. हिंजवडी आणि आजूबाजूच्या गावांचा महापालिकेत समावेश झाल्यास विकासाला गती मिळेल आणि नागरिकांना शासकीय सुविधा अधिक सुलभपणे मिळतील. तसेच, चाकण, आळंदी आणि राजगुरुनगर या नगरपरिषदांचा स्वतंत्र महापालिकेत समावेश झाल्यास, त्या परिसराचाही सर्वांगीण विकास शक्य होईल. मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या विषयावर स्वयंसेवी संस्था, लोकप्रतिनिधी आणि तज्ज्ञांबरोबर सविस्तर चर्चा करण्यासाठी बैठक घेण्याची विनंती केली आहे. या बैठकीत सर्व संबंधितांचे मत जाणून घेऊन योग्य दिशा आणि निर्णय होईल, असा विश्वास आहे.
> **-महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# पिंपरी महापालिकेला न्यायालयाचा दणका

### सात कोटी 5 लाख परत करण्याची नामुष्की

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जादा दराने बिगरनिवासी मालमत्ताकर वसूल केल्याने पिंपरी-चिंचवड महापालिकेस न्यायालयाने दणका दिला आहे. त्यामुळे महापालिकेच्या कर संकलन विभागास तब्बल ७ कोटी ५ लाख ८८ हजार ६६५ रुपयांचा धनादेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नावाने परत करण्याची नामुष्की ओढविली आहे.**



कर संकलन विभागाकडून निवासी व बिगरनिवासी मालमत्तांवर मालमत्ताकराची आकारणी केली जाते. कर संकलन विभागाने चिंचवड, एफ टू ब्लॉक, एमआयडीसी येथील वंडर कार्स प्रा.लि. यांच्या मालमत्तेवर बिगरनिवासी दरापेक्षा अधिक मालमत्ताकरात दुरुस्ती व मालमत्ताकरापेटी जमा केलेली ७ कोटी ५ लाख ८८ हजार ६६५ रुपयांचा परतावा मिळण्याची मागणी वंडर कार्सचे संचालक विजयकुमार आगरवाल यांनी ७ नोव्हेंबर २०२२च्या अर्जाद्वारे महापालिकेकडे केली होती.

त्यावर महापालिकेने काहीच कार्यवाही न केल्याने आगरवाल यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. १७ मार्च २०२५ ला सुनावणी झाली. न्यायालयाने आगरवाल यांनी मागणी केलेली रक्कम जमा करण्याचे आदेश महापालिकेस दिले आहेत. उच्च न्यायालयाच्या नावाने जमा करण्याचा आदेश महापालिका आयुक्तांना दिला. त्यानुसार कर संकलन विभागाने न्यायालयाच्या नावाने धनादेश २७ मार्च २०२५ ला न्यायालयाकडे जमा केला आहे. त्या खर्चास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी समितीची कार्योत्तर मान्यता दिली आहे.


## महापालिका निवडणुकीसाठी वार्डस्तरीय प्रश्नांवर प्रभावीपणे काम करा

### काँग्रेसच्या बी. एम. संदीपकुमार यांचे आवाहन

। पिंपरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

महापालिका निवडणूकीसाठी वॉर्डस्तरीय प्रश्नांवर प्रभावीपणे काम करा, असे आवाहन अखिल भारतीय काँग्रेस कमिटीयांचे सेक्रेटरी तथा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सहप्रभारी बी. एम. संदीपकुमार यांनी केले. पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी शहर काँग्रेसच्या वतीने करण्यात येत असलेल्या नियोजनाबाबत अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी तथा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सहप्रभारी बी. एल. संदीपकुमार यांच्या उपस्थितीत आढावा बैठक डांगे चौक, थेरगाव येथे घेण्यात आली. यावेळी शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम यांच्या हस्ते महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सहप्रभारी बी. एल. संदीपकुमार यांना पुणेरी पगडी, शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. महापालिकांच्या निवडणूक अनुषंगाने राज्यभरामध्ये प्रदेश काँग्रेस पक्षाकडून प्रभारी यांची नियुक्ती करून प्रत्येक महानगरपालिका क्षेत्रामध्ये कार्याचा आढावा घेण्यात येत आहे. विशेषतः ब्लॉक कमिटीच्या कार्याचा आढावा, सर्व सेल व विभाग यांच्या अध्यक्षांशी व्यक्तीगत चर्चा आणि आगामी काळामध्ये काँग्रेसच्या असलेल्या नियोजना संदर्भामध्ये ही बैठक महत्त्वपूर्ण होती. या बैठकीमध्ये पिंपरी, चिंचवड, भोसरी ब्लॉकच्या अध्यक्षांनी आपापल्या ब्लॉकचा अहवाल प्रभारींकडे सादर केला. प्रदेश काँग्रेस ठरवेल त्याप्रमाणे आघाडी किंवा स्वतंत्र निवडणुका लढण्याची शहर काँग्रेसची तयारी आहे. सामान्य कार्यकर्त्यांना न्याय मिळावा तसेच सामान्य युवकांना संधी मिळावी याकरिता त्यांना तिकीट देऊन नेतृत्व करण्याची संधी दिली जाईल, त्यासाठी स्थानिक प्रश्नांवर प्रभावीपणे काम करावे अशा सूचना सह-प्रभारींनी पदाधिकाऱ्यांना दिल्या.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### नियम थोडा करावा, पण तो शाश्वताचा असावा.

ज्या झाडाची वाढ व्हावी असे आपल्याला वाटते, त्या झाडाला आपण पाणी घालतो, त्याची मशागत करतो, त्या झाडाकडे जास्त लक्ष पुरवितो. परंतु जे झाड वाढू नये असे वाटते, किंवा ज्या झाडाचे विशेष महत्त्व आपल्याला वाटत नाही, त्या झाडाकडे आपण दुर्लक्ष करतो. तसे, जेणेकरून परमेश्वराच्या ठिकाणी बुद्धी स्थिर होईल, त्याची जोपासना करावी. देहाकडे, विचारांकडे, विषयांकडे दुर्लक्ष करावे, म्हणजे आपोआपच त्यांचा विसर पडेल. ज्याप्रमाणे एखाद्या झाडाची जोपासना करताना, त्याला गुराढोरांनी खाऊ नये म्हणून त्याच्याभोवती कुंपण घालावे लागते, त्याप्रमाणे परमार्थ हा खरा कुंपणातच ठेवावा; तो जितका गुप्त राहील तितका चांगला. त्याचे प्रदर्शन झाले तर त्याला दृष्ट लागते. म्हणून परमार्थ हा कोणाच्या न कळत, परंतु अत्यंत आवडीने करावा. झाड लावल्यावर ते किती वाढले आहे हे कुणी रोज उकरून पाहत नाही, त्याप्रमाणे अनुभवाच्या, प्रचीतीच्या मागे लागू नका; त्यामुळे प्रगती खुंटेल.

हट्टी आणि व्यसनी माणसे एका दृष्टीने मला आवडतात; कारण त्यांचा हट्ट भगवंताच्या मार्गाला लावला की झाले. परमार्थात नियम थोडाच करावा, पण तो शाश्वताचा असावा; म्हणजे, जेणेकरून भगवंताचे प्रेम लागेल याबद्दलचा असावा, आणि तो प्राणाबरोबर सांभाळावा. जे अत्यंत थोर भाग्याचे असतात त्यांनाच ध्यानमार्ग साधतो. हा मार्ग फार थोरांचा आहे. ध्यानामध्ये जगाचाच विसर पडतो; त्या अवस्थेमध्ये दिवस काय पण पाच वर्षेसुद्धा जातील, पण त्याच्या देहाला काही होणार नाही. आपल्यासारख्याला साधनांत साधन म्हणजे भगवंताचे नाम; दानांत दान म्हणजे अन्नदान; आणि उपासनांत उपासना म्हणजे सगुणाची उपासना होय; या तिन्हींमुळे देहाचा विसर पडतो. म्हणून शक्य तो या तीन गोष्टींची कास धरा. मनुष्याची साहजिक प्रवृत्ती व्याप वाढविण्याकडे असते. द्वैत वाढवून त्यात अद्वैत पाहण्यात आनंद असतो हेही खरे. साधे मधमाश्यांचे उदाहरण घ्या. त्या अनेक झाडांवरून मध गोळा करतात आणि नंतर तो पोवळ्यात एकत्र करतात. अशा एकत्र केलेल्या मधाचा केवढा गोड साठा होऊ शकतो बरे ! अशा रीतीने सर्व द्वैतामध्ये एक अद्वैत, म्हणजे एक राम, पहायला शिकावे; आणि ज्याला सर्वत्र राम पाहणे असेल त्याने स्वतःमध्येच राम पाहून, प्रत्येक कृती ही रामाची समजावी. स्वतःमध्ये राम पाहिल्याशिवाय तो सर्वत्र पाहता येणार नाही. तेव्हा स्वतःचा म्हणजेच देहाचा विसर पडल्याशिवाय सुख लाभणार नाही, आणि हा देहाचा विसर राममय सृष्टी झाल्यानेच होईल. म्हणून अखंड भगवंताच्या अनुसंधानात रहा.

बोधवचन:- परमार्थाला अगदी स्वतःपासून सुरुवात करायची असते.

# ‘महायुती’ मध्ये आता, वादाचे भोंगे वाजणार!



‘स्टेट’मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**मशिदीवरील भोंग्यांचा वाद पेटण्याची चिन्हं असून किरीट सोमय्या यांच्या नेतृत्वाखाली भाजपाचा हिंदुत्वाचा जागर आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा धर्मनिरपेक्षतेचा राग पुढं आल्यामुळं ‘महायुती’ मध्ये वादाचे भोंगे वाजणार, हे मात्र स्पष्ट झालं आहे.**



### अजितदादांची तंबी..

किरीट सोमय्यांनी मशिदीत जाऊ नये. मशिदीच्या भोंग्यावरुन कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर त्याला सोमय्या जबाबदार असतील, असं अजित पवार यांनी फक्त सुनावलंच नाही, तर थेट तंबीच दिली आहे. भाजपाचा हिंदुत्वाचा जागर अन् अजितदादांचा धर्मनिरपेक्षतेचा राग, महायुतीत वादाचे भोंगे वाजणार, आणि वाजलेच तर केव्हापासून? हे मात्र अनिश्चित झाले आहे.

### सरकारच्या धोरणाची चिरफाड..

अजितदादा ‘महायुती सरकार’ मध्ये उपमुख्यमंत्री आहेत. पण, महायुती सरकारमध्ये राहून सरकारच्या धोरणांची चिरफाड करण्याचं तंत्र अजितदादांनी अवगत केलं आहे. मुद्दा हिंदुत्वाचा असो, हिंदीचा असो अथवा अल्पसंख्याकांचा... दादांची भूमिका सरकारच्या निर्णयांविरोधातच राहिल्याचं दिसून आलं आहे.

### हिंदी वरून सरकारला घरचा आहेत..

आधी हिंदीवरून सरकारला घरचा आहेर दिल्यानंतर आता मशिदीवरच्या भोंग्यांच्या मुद्द्यावरून दादांनी आपलाच मित्रपक्ष असलेल्या भाजपच्या सोमय्यांची कानउघाडणी केली.

### ‘ईडीची पीडा’ स्पेशल !

भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून विरोधकांच्या मागं ‘ईडीची पिडा’ लावण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या किरीट सोमय्यांनी आपला मोर्चा मशिदीवरच्या भोंग्याकडं वळवला. मशिदीवरच्या भोंग्याविरोधात आरोळी ठोकणाऱ्या किरीट सोमय्यांना अजितदादांनी खडे बोल सुनावले. दुसरं कुणी नाही तर थेट उपमहायुती सरकारमधले मुख्यंमंत्री अजित पवारच मैदानात उतरले.

### आमदारांची अजितदादांकडे तक्रार..

मशिदींवरच्या भोंग्यांवर कारवाई करण्यासाठी सोमय्या दबाव टाकत असल्याची तक्रार मुस्लिम आमदारांनी अजितदादांकडं केली. त्यानंतर अजितदादांनी सह्याद्री अतिथीगृहावर या विषयावर थेट बैठकच घेतली. या बैठकीला मुंबईचे पोलिस आयुक्त देवेन भारती, सपाचे आमदार अबू आझमी, राष्ट्रवादीचे नेते नवाब मलिक आणि सना मलिक, झिशान सिद्दीकी आणि इतर काही मुस्लिम संघटनांचे प्रतिनिधी हजर होते.

### सोमय्यांनी मशिदीत जाऊ नये..

बैठकीत अजितदादांनी आपल्याच सरकारमध्ये मित्रपक्षाचे नेते असलेल्या सोमय्यांसाठी थेट फर्मानच काढलं. किरीट सोमय्यांनी मशिदीत जाऊ नये, अशी सूचना अजितदादांनी केली. सोमय्या मशिदीत गेल्यास कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, असं दादा म्हणाले. थोडक्यात काय अजितदादांनी सोमय्यांना भेट दमच भरला आहे !

### कायद्याच्या चौकटीत बघा..

कायद्याच्या चौकटीत बसत असलेल्या मशिदींवर कारवाई नको, अशी सूचना अजितदादांनी केली. तणाव निर्माण झाल्यास त्याला भाजपा नेते किरीट सोमय्या जबाबदार असतील, असं निवेदन मुस्लिम संघटनांनी दिलं आणि ती बाब अजितदादांनी अतिशय गांभीर्यानं घेतली.

### पोलिसांची अडचण समोर..

मुस्लिम संघटनांकडून सुरू असलेल्या आरोपांबाबत पोलिस आयुक्त देवेन भारती यांनी देखील पोलिसांची अडचण अजित पवारांच्या निदर्शनास आणून दिली. 46 ते 56 डेसिबल मर्यादा पाळणे शक्य नसल्याचं म्हटलं असल्यामुळं मोबाईलवर प्रात्यक्षिक करून दाखवताना त्यांच्या सुरू असलेल्या बैठकीतील आवाज देखील ४६ डेसिबलपेक्षा जास्त आहे असं स्पष्ट केलं आहे. ही अडचण पुढील काळात येणाऱ्या मोठ्या सणांच्या बाबतदेखील होऊ शकते हे देखील स्पष्ट केलं आहे!

### मुस्लिम नेत्यांकडून टीकेची झोड !

या बैठकीच्या वेळी आणि नंतर मुस्लीम नेत्यांनी किरीट सोमय्या यांच्यावर टीकेची झोड उठवली. नियम केवळ आमच्यासाठीच आहेत का? असा प्रश्न समाजवादी पार्टीचे आमदार अबू आझमी यांनी केला. तर प्रशासनाचा निर्णय आमच्या बाजूनं असेल असा विश्वास वारिस पठाण यांनी व्यक्त केला.

### भाजपाकडून सोमय्यांची पाठराखण !

एकीकडे भोंग्याच्या मुद्द्यावरून अजितदादांनी तंबी दिली, असली तरी भाजपानं मात्र किरीट सोमय्यांची पाठराखण केली आहे. किरीट सोमय्या यांची मागणी योग्य आहे, असं भाजपाचे मंत्री आशिष शेलार म्हणाले आहेत.

### मनसेचा मुद्दा ‘हायजॅक’?

खरंतर मशिदीवरच्या भोंग्यांवरून सर्वात आधी आवाज उठवला तो महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं.. महाविकास आघाडी सरकारच्या काळात हिंदुत्वाचा जागर करत भोंग्यांच्या मुद्द्यावरून राज ठाकरेंनी उद्धव ठाकरे सरकारला जेरीस आणण्याचा प्रयत्न केला. आता महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर भाजपानं किरीट सोमय्यांना पुढं करत मनसेचा भोंग्यांचा मुद्दा ‘हायजॅक’ करण्याचा डाव टाकला आहे, हे प्रत्येकाच्या लक्षात आलं असेलच !

### अंतर्गत मतभेदांना तोंड फुटले..

विशेष म्हणजे भाजपानं हाती घेतलेल्या भोंग्यांविरोधातल्या मोहिमेवरून त्यांच्याच सरकारमधल्या उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दंड थोपटलेत आणि अंतर्गत संघर्ष सुरू झाला आहे. आपल्याच सरकारच्या एखाद्या धोरणाला विरोध करण्याची अजित पवारांनी ही पहिलीच वेळ नाही. पहिलीपासून हिंदीसक्तीविरोधातही त्यांनी ठाम भूमिका घेत पहिलीपासून हिंदी नको असं म्हटलं आहे.

### महायुतीत आता वादाचे भोंगे ?

हिंदुत्वाची भाषा करणाऱ्या ‘महायुती’ सरकारमध्ये राहून अजितदादा अल्पसंख्याकांचा चेहरा बनण्याचा प्रयत्न करत आहेत. आपल्या व्होटबँकेकडे लक्ष ठेवत धर्मनिरपेक्षतेशी इमान बाळगून आहेत. म्हणूनच मुस्लिम समाजाचं म्हणणं ऐकून घेत त्यांनी भाजपच्या सोमय्यांना खरंखोटं सुनावण्याचं धाडस केलं. आता महायुतीचं हिंदुत्वाचा जागर आणि अजितदादांचा धर्मनिरपेक्षतेचा राग यावरून सरकारमध्येच वादाचे भोंगे वाजण्याची शक्यता आहे. या दोन मित्र पक्षांमधील भोंग्यांमुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मात्र कानठळ्या बसणार आहे हे नक्की!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# पोलाद, खनिज उद्योगांना चालना!

## गडचिरोलीत नक्षलवाद्यांचा प्रभाव ओसरला

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**एके काळी नक्षलग्रस्त आणि अविकसित जिल्हा म्हणून राज्यात ओळख असलेल्या गडचिरोलीचे आता चित्र बदलू लागले आहे. नक्षलवाद्यांचा प्रभाव कमी झाल्याने लोहखनिजावर आधारित उद्योगवाढीला चालना मिळाली आहे. कोनसरी येथे मोठा लोह प्रकल्प आकारास येत असताना चामोर्शी, देसाईगंज तालुक्यातदेखील पोलाद निर्मिती कारखाना सुरू करण्यास नामांकित उद्योग समूह उत्सुक आहेत. त्यामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. दुसरीकडे वन क्षेत्र सात टक्क्यांनी घटल्याने चिंता व्यक्त करण्यात येत आहे.**



साक्षरतेचे प्रमाण ७४ टक्के इतके आहे, मात्र गुणवत्तापूर्ण व रोजगाराभिमुख उच्च शिक्षणाच्या अभावामुळे बेरोजगार तरुणांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मिळून ३९३ शाळा आहेत. यात ९३ आश्रमशाळांचा समावेश असून ३० हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेतात. या वर्षी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयदेखील सुरू झाले आहे. दुसरीकडे स्थापनेच्या दशकपूर्तीनंतरही गोंडवाना विद्यापीठाला लय सापडलेली दिसत नाही.नक्षलवादी कारवाया गेल्या तीन वर्षांत कमी झाल्या आहेत. विविध दलांतील कार्यरत पाच हजारांहून अधिक जवान, १७ पोलीस ठाणे आणि ४५ पेक्षा अधिक दुर्गम भागात कार्यरत पोलीस मदत केंद्रे व पथके या माध्यमातून नक्षल्यांवर अंकुश ठेवण्यात पोलिसांना यश आले आहे.

राष्ट्रीयीकृत, सरकारी आणि सहकार अशा विविध बँकांच्या केवळ १२२ शाखा जिल्ह्यात कार्यान्वित आहेत. म्हणजेच एक लाख लोकसंख्येमागे केवळ ११ शाखा आहेत. लोहखनिजांमुळे उद्योगांना चालना मिळाली असली तरी पायाभूत सुविधेच्या निर्मितीचा प्रवास अद्यापही अपूर्ण आहे.राज्यात सर्वाधिक जंगल गडचिरोली जिल्ह्यात आहे. जिल्ह्याचा ८९ टक्के भूभाग वन क्षेत्रात येतो. त्यातील ६८ टक्के भूभागावर जंगल आहे. येथून मिळणाऱ्या वनउपजावर आदिवासी समाजाचे आर्थिक चक्र अवलंबून असते. दरवर्षी बांबू, तेंदुपानाच्या व्यवसायामधून शेकडो कोटींची उलाढाल होते. याशिवाय साग, बिजा, शिसम, हळदू, मोहफूल, चार, धाबडा, बेहडा, आवळा यासारख्या असंख्य गौण वनौषधी येथील जंगलात आढळतात.(पेसा) कायद्याच्या तरतुदीमुळे ग्रामसभा, वनसमिती वनहक्क यासारखे कायदे, संस्था निर्माण करण्यात आल्या. मात्र प्रशासनाच्या दिरंगाईने त्याची योग्य अंमलबजावणी होत नाही. परिणामी समन्वयाअभावी नैसर्गिक संपत्तीचा व्यवसायाच्या दृष्टीने हवा तसा नफा येथील स्थानिकांना होत नाही. त्यामुळे यावर आधारित उद्योग प्रत्यक्षात आकारास असल्यास मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती शक्य आहे.साक्षरतेचे प्रमाण ७४ टक्के इतके आहे, मात्र गुणवत्तापूर्ण व रोजगाराभिमुख उच्च शिक्षणाच्या अभावामुळे बेरोजगार तरुणांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मिळून ३९३ शाळा आहेत. यात ९३ आश्रमशाळांचा समावेश असून ३० हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेतात. या वर्षी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयदेखील सुरू झाले आहे.

### समन्वयाचा अभाव

दुसरीकडे स्थापनेच्या दशकपूर्तीनंतरही गोंडवाना विद्यापीठाला लय सापडलेली दिसत नाही.नक्षलवादी कारवाया गेल्या तीन वर्षांत कमी झाल्या आहेत. विविध दलांतील कार्यरत पाच हजारांहून अधिक जवान, १७ पोलीस ठाणे आणि ४५ पेक्षा अधिक दुर्गम भागात कार्यरत पोलीस मदत केंद्रे व पथके या माध्यमातून नक्षल्यांवर अंकुश ठेवण्यात पोलिसांना यश आले आहे.राष्ट्रीयीकृत, सरकारी आणि सहकार अशा विविध बँकांच्या केवळ १२२ शाखा जिल्ह्यात कार्यान्वित आहेत. म्हणजेच एक लाख लोकसंख्येमागे केवळ ११ शाखा आहेत. लोहखनिजांमुळे उद्योगांना चालना मिळाली असली तरी पायाभूत सुविधेच्या निर्मितीचा प्रवास अद्यापही अपूर्ण आहे.राज्यात सर्वाधिक जंगल गडचिरोली जिल्ह्यात आहे. जिल्ह्याचा ८९ टक्के भूभाग वन क्षेत्रात येतो. त्यातील ६८ टक्के भूभागावर जंगल आहे.

# प्राथमिक शिक्षणामध्ये हिंदीचा हट्ट सोडावा

## राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार ठाकरे बंधूंची भूमिका योग्यच

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या लहान मुलांमध्ये भाषा आत्मसात करण्याची क्षमता कमी असते. त्यामुळे प्राथमिक शिक्षणामध्ये हिंदी भाषेची सक्ती नको. इयत्ता ५ वीपर्यंत सरकारने हिंदीचा हट्ट सोडावा, असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. तसेच या प्रश्नावर ठाकरे बंधूंनी घेतलेली भूमिका योग्यच असल्याचे सांगितले.**



पवार म्हणाले, हिंदी भाषेची सक्ती नको. कोणतीही भाषा प्रवाही असते. मात्र त्या संदर्भातले निर्णय ऐच्छिक असावेत. प्राथमिक शिक्षणामध्ये त्याची सक्ती केली जाऊ नये, असेही ते म्हणाले. मुले विशिष्ट वयात हिंदी किती आत्मसात करतील हे सांगणे व्यक्तिसापेक्ष आहे. हिंदी सक्तीपेक्षा कृत्रिम बुद्धिमत्ताही मुलांसाठी महत्त्वाची आहे. त्याचे शिक्षण मुलांना मिळावे. त्यासंदर्भात विशिष्ट प्रक्रिया विकसित करणे याचा विचार केंद्र सरकारने केला पाहिजे.आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी संदर्भात बोलताना पवार म्हणाले, याबाबत आघाडीतील तिन्ही घटक पक्षांची एक प्राथमिक बैठक झाली आहे. या निवडणुका महाराष्ट्रामध्ये महाविकास आघाडीच्या माध्यमातून लढल्या जातील.

काही ठिकाणी स्थानिक राजकीय समीकरणे पाहून निर्णय घेऊ. शक्तिपीठ मार्गाला सांगली व कोल्हापूर येथील शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. यासंदर्भात पवार म्हणाले, की हा प्रकल्प काय आहे, तो मला समजून घ्यायचा आहे. इराण-इस्राइल संघर्षामध्ये भारताला स्पष्ट भूमिका घ्यावी लागेल, असेही ते या वेळी म्हणाले. पवार म्हणाले, हिंदी भाषेची सक्ती नको. कोणतीही भाषा प्रवाही असते. मात्र त्या संदर्भातले निर्णय ऐच्छिक असावेत. प्राथमिक शिक्षणामध्ये त्याची सक्ती केली जाऊ नये, असेही ते म्हणाले. मुले विशिष्ट वयात हिंदी किती आत्मसात करतील हे सांगणे व्यक्तिसापेक्ष आहे. हिंदी सक्तीपेक्षा कृत्रिम बुद्धिमत्ताही मुलांसाठी महत्त्वाची आहे. त्याचे शिक्षण मुलांना मिळावे. त्यासंदर्भात विशिष्ट प्रक्रिया विकसित करणे याचा विचार केंद्र सरकारने केला पाहिजे.

### हिंदी भाषेची सक्ती नको

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी संदर्भात बोलताना पवार म्हणाले, याबाबत आघाडीतील तिन्ही घटक पक्षांची एक प्राथमिक बैठक झाली आहे. प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या लहान मुलांमध्ये भाषा आत्मसात करण्याची क्षमता कमी असते. त्यामुळे प्राथमिक शिक्षणामध्ये हिंदी भाषेची सक्ती नको. इयत्ता ५ वीपर्यंत सरकारने हिंदीचा हट्ट सोडावा, असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. तसेच या प्रश्नावर ठाकरे बंधूंनी घेतलेली भूमिका योग्यच असल्याचे सांगितले. या निवडणुका महाराष्ट्रामध्ये महाविकास आघाडीच्या माध्यमातून लढल्या जातील. काही ठिकाणी स्थानिक राजकीय समीकरणे पाहून निर्णय घेऊ. शक्तिपीठ मार्गाला सांगली व कोल्हापूर येथील शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. यासंदर्भात पवार म्हणाले, की हा प्रकल्प काय आहे.

# एससीओना संरक्षणमंत्र्यांचे खडेबोल!

## पहलगाम हल्ल्याचा उल्लेख नसल्याने स्वाक्षरीस नकार

**।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज।**

**पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाबाबत भारताला वाटणारी चिंता आणि पहलगाम हल्ल्याचा स्पष्ट उल्लेख नसल्यामुळे शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) परिषदेत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी जोरदार टीका केली. संयुक्त जाहीरनाम्यावर स्वाक्षरी करण्यासही त्यांनी नकार दिल्यामुळे परिषदेचा समारोप संयुक्त जाहीरनाम्याशिवाय झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.**



राजनाथ सिंह यांनी दहशतवादाविरुद्ध भारताची भूमिका ठामपणे मांडून ‘एससीओ’च्या सदस्य देशांना दहशतवादविरोधी लढ्यासाठी आणि त्यातील दुटप्पीपणा थांबविण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले. या परिषदेला पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ आणि चीनचे संरक्षणमंत्री डोंग जूनदेखील उपस्थित होते. त्यांच्या समक्षच संरक्षणमंत्र्यांनी दहशतवादावरून खडेबोल सुनावले. मात्र जाहीरनाम्याच्या आराखड्यात पहलगाम हल्ल्याचा उल्लेख नव्हता. तसेच, पाकिस्तानपुरस्कृत सीमापार दहशतवादाबाबत भारताच्या भूमिकेचाही उल्लेख नव्हता. यावर सिंह म्हणाले, की शांतता आणि समृद्धी दहशतवादाबरोबर आणि अराष्ट्रीय घटकांमध्ये, दहशतवादी गटांमध्ये महासंहारक शस्त्रांचा प्रसार करून राहू शकतनाही. या आव्हानांचा सामना करण्यासाठी निर्णायक कृतीची आवश्यकता आहे. दहशतवादाचे पुरस्कर्ते, पोशिंदे आणि वापरकर्त्यांची संकुचित, स्वार्थी उद्दिष्टे पूर्ण करणाऱ्यांना त्याचे परिणाम भोगावे लागणे आवश्यक आहे असल्याचे संरक्षणमंत्र्यांनी खडसावले.राजनाथ सिंह यांनी गुरुवारी बेलारूसचे संरक्षणमंत्री विक्टॉर क्रेनिन यांची भेट घेतली. द्विस्तरावरील संरक्षणसंबंध अधिक मजबूत करण्यावर उभयतांत चर्चा झाली. रशियाचे संरक्षणमंत्री अँड्रे बिलोसोव्ह यांच्याशीही प्रादेशिक सुरक्षा आणि द्विस्तरावरील संरक्षण संबंधांवर त्यांनी चर्चा केली.राजनाथ सिंह यांनी दहशतवादाविरुद्ध भारताची भूमिका ठामपणे मांडून ‘एससीओ’च्या सदस्य देशांना दहशतवादविरोधी लढ्यासाठी आणि त्यातील दुटप्पीपणा थांबविण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले. या परिषदेला पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ आणि चीनचे संरक्षणमंत्री डोंग जूनदेखील उपस्थित होते. त्यांच्या समक्षच संरक्षणमंत्र्यांनी दहशतवादावरून खडेबोल सुनावले. मात्र जाहीरनाम्याच्या आराखड्यात पहलगाम हल्ल्याचा उल्लेख नव्हता. तसेच, पाकिस्तानपुरस्कृत सीमापार दहशतवादाबाबत भारताच्या भूमिकेचाही उल्लेख नव्हता. यावर सिंह म्हणाले, की शांतता आणि समृद्धी दहशतवादाबरोबर आणि अराष्ट्रीय घटकांमध्ये, दहशतवादी गटांमध्ये महासंहारक शस्त्रांचा प्रसार करून राहू शकतनाही. या आव्हानांचा सामना करण्यासाठी निर्णायक कृतीची आवश्यकता आहे. दहशतवादाचे पुरस्कर्ते, पोशिंदे आणि वापरकर्त्यांची संकुचित, स्वार्थी उद्दिष्टे पूर्ण करणाऱ्यांना त्याचे परिणाम भोगावे लागणे आवश्यक आहे असल्याचे संरक्षणमंत्र्यांनी खडसावले.

### जाहीरनामा का नाही?

राजनाथ सिंह यांनी गुरुवारी बेलारूसचे संरक्षणमंत्री विक्टॉर क्रेनिन यांची भेट घेतली. द्विस्तरावरील संरक्षणसंबंध अधिक मजबूत करण्यावर उभयतांत चर्चा झाली. रशियाचे संरक्षणमंत्री अँड्रे बिलोसोव्ह यांच्याशीही प्रादेशिक सुरक्षा आणि द्विस्तरावरील संरक्षण संबंधांवर त्यांनी चर्चा केली.पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाबाबत भारताला वाटणारी चिंता आणि पहलगाम हल्ल्याचा स्पष्ट उल्लेख नसल्यामुळे शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) परिषदेत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी जोरदार टीका केली. . राजनाथ सिंह यांनी दहशतवादाविरुद्ध भारताची भूमिका ठामपणे मांडून ‘एससीओ’च्या सदस्य देशांना दहशतवादविरोधी लढ्यासाठी आणि त्यातील दुटप्पीपणा थांबविण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले.

# पाकिस्तान समर्थनावरून ममदानी लक्ष्य

## काँग्रेसच्या सिंघवींसह भाजपच्या कंगणा रनौत यांचे टीकास्त्र

**।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज।**

**अमेरिकेतील न्यूयॉर्कच्या महापौरपदाच्या निवडणुकीत भारतीय वंशाचे जोहरान ममदानी यांनी विजय मिळवत इतिहास रचला. परंतु, ममदानी जेव्हा बोलतात, तेव्हा पाकिस्तानचे जनसंपर्क अधिकारी निवांत असतात, अशी टीका काँग्रेस खासदार अभिषेक सिंघवी यांनी गुरुवारी केली. तर भाजपच्या खासदार कंगना रानौत यांनीही संघवी यांच्या सुरात सूर मिसळत भारतीय वंशाचे ममदानी भारतापेक्षा पाकिस्तानचे जास्त वाटतात, अशी टीका केली.**



चित्रपट निर्मात्या मीरा नायर आणि भारतीय वंशाचे युगांडातील लेखक महमूद ममदानी यांचे पुत्र असलेले जोहरान ममदानी यांनी मंगळवारी न्यूयॉर्क शहराच्या महापौरपदासाठी डेमोक्रॅटिक प्रायमरीमध्ये मोठा विजय मिळविला. परंतु ‘जेव्हा जोहरान ममदानी तोंड उघडतात तेव्हा पाकिस्तानची ‘पीआर टीम’ सुट्टी घेते.न्यूयॉर्कमधून काल्पनिक गोष्टी कथन करणाऱ्या त्यांच्यासारख्या सहयोगी शत्रूंची भारताला गरज नाही,’ असे सिंघवी यांनी ‘एक्स’ संदेशात म्हटले आहे.भाजपच्या राज्यसभा खासदार रनौत यांनीही सिंघवी यांच्या वक्तव्याला सहमती दर्शवली. ‘जोहरान यांची आई पद्मश्री मीरा नायर सर्वोत्तम चित्रपट निर्मात्या आहेत.

या प्रसिद्ध लेखकाशी लग्न केले. त्यांचा मुलगा जोहरान भारतीयांपेक्षा जास्त पाकिस्तानी वाटतो,’ अशी टीका त्यांनी ‘एक्स’वरून केली आहे. ‘ते आता हिंदू धर्म पुसून टाकण्यास तयार आहेत, व्वा...सगळीकडे हीच परिस्थिती आहे, असेही रनौत यांनी नमूद केले.चित्रपट निर्मात्या मीरा नायर आणि भारतीय वंशाचे युगांडातील लेखक महमूद ममदानी यांचे पुत्र असलेले जोहरान ममदानी यांनी मंगळवारी न्यूयॉर्क शहराच्या महापौरपदासाठी डेमोक्रॅटिक प्रायमरीमध्ये मोठा विजय मिळविला. तेव्हा पाकिस्तानची ‘पीआर टीम’ सुट्टी घेते.

### भारतापेक्षा पाकिस्तानचे जास्त वाटतात

न्यूयॉर्कमधून काल्पनिक गोष्टी कथन करणाऱ्या त्यांच्यासारख्या सहयोगी शत्रूंची भारताला गरज नाही,’भाजपच्या राज्यसभा खासदार रानौत यांनीही सिंघवी यांच्या वक्तव्याला सहमती दर्शवली. ‘जोहरान यांची आई पद्मश्री मीरा नायर सर्वोत्तम चित्रपट निर्मात्या आहेत. भारतात जन्मलेल्या आणि वाढलेल्या मीरा यांनी मेहमूद ममदानी (गुजराती वंशाचा) या प्रसिद्ध लेखकाशी लग्न केले. त्यांचा मुलगा जोहरान भारतीयांपेक्षा जास्त पाकिस्तानी वाटतो,’ अशी टीका त्यांनी ‘एक्स’वरून केली आहे. ‘ते आता हिंदू धर्म पुसून टाकण्यास तयार आहेत, व्वा...सगळीकडे हीच परिस्थिती आहे, असेही रनौत यांनी नमूद केले.अमेरिकेतील न्यूयॉर्कच्या महापौरपदाच्या निवडणुकीत भारतीय वंशाचे जोहरान ममदानी यांनी विजय मिळवत इतिहास रचला. परंतु, ममदानी जेव्हा बोलतात.

# मालिका सुरू होण्यापूर्वीच 'कमळी'चं सर्वत्र होतंय कौतुक!

'झी मराठी' वाहिनीवर येत्या ३० जूनपासून 'कमळी' ही नवीन मालिका प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या मालिकेत अभिनेत्री विजया बाबर प्रमुख भूमिका साकारणार आहे. खेडेगावातील 'कमळी' अभ्यासात प्रचंड हुशार असते, उच्च शिक्षण घेण्यासाठी तिने आता शहरातील कॉलेजमध्ये प्रवेश घेतला आहे. पण, 'कमळी'चा भूतकाळ वेगळाच असतो. हा संपूर्ण प्रवास प्रेक्षकांना या मालिकेत पाहायला मिळणार आहे. अलीकडच्या काळात खेडेगावातील प्रत्येक मुलगी उच्च शिक्षणाचं स्वप्नं पाहतेय. हे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी गरज असते ती संधीची आणि प्रोत्साहनाची... हीच महत्त्वाची गोष्ट लक्षात घेऊन 'कमळी' मालिकेच्या टीमने एक स्तुत्य पाऊल उचललं आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील 'कुरुंदवाड' मधील शाळेत जाऊन 'कमळी'च्या टीमने १०० मुलींना सायकल वाटप केलं. या मुली दररोज शाळेत ८ ते १० किमी प्रवास करून शाळेत येतात. त्यांना शाळेत पोहोचण्यासाठी सार्वजनिक वाहतूक म्हणजे एसटी बसचा एकमेव आधार, पण त्याही फेऱ्या मर्यादित. त्यामुळे शाळेत वेळेवर पोहोचणं, परत येणं हे या मुलींसाठी एक आव्हान असतं. यामुळेच या मुलींना 'कमळी'ने सायकल भेट म्हणून दिल्या. या स्तुत्य



उपक्रमाबद्दल सर्वांनी मालिकेच्या टीमचं कौतुक केलं आहे.
अभिनेत्री विजया बाबर म्हणजे आपल्या सर्वांची 'कमळी' याबद्दल म्हणते, "या मुलींच्या डोळ्यांत शिक्षणाचं स्वप्न पाहिलं, आणि त्या स्वप्नपूर्तीमध्ये आपला खारीचा वाटा असणार आहे याचं सुख मला मिळालं. सायकल ही फक्त एक वाहन नाही, ती त्या मुलींच्या शिक्षणाच्या प्रवासाची सुरुवात आहे."
विजया पुढे म्हणाली, "सायकल हातात घेतल्यावर त्या शाळकरी मुलींच्या चेहऱ्यावर जे हास्य उमटलं, ते पाहून डोळ्यांत नकळत पाणी आलं. एक साधी सायकल त्यांच्यासाठी किती मोठा आधार ठरू शकते, हे प्रत्यक्ष अनुभवलं. शाळेपर्यंतचा रस्ता आता त्यांच्यासाठी अडथळा न राहता संधीचा मार्ग बनतो आहे, हे पाहून खूप समाधान वाटतं. शिक्षण हे प्रत्येकाचं हक्काचं स्वप्न आहे आणि त्या स्वप्नाला गती देणं हीच कमळीची भूमिका आहे."

## तुमच्या बरोबर झालंय का कधी असं?

चला हवा येऊ द्या' या कार्यक्रमातून घराघरात पोहोचलेल्या कुशल बद्रिकेने आपल्या विनोदाच्या अचूक टाइमने प्रेक्षकांच्या मनात अटळ स्थान निर्माण केलं आहे. त्याने आपल्या सहजसुंदर अभिनय आणि विनोदी शैलीच्या जोरावर मराठी सिनेसृष्टीत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे कुशलचा एक वेगळा चाहता वर्ग तयार झाला आहे. नुकतीच कुशलने व्हेलेंटाइन डेनिमित्ताने बायकोसाठी एक खास पोस्ट शेअर केली आहे. अभिनेत्याच्या या पोस्टने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे.अभिनेता कुशल बद्रिकेने बायको सुनयना बद्रिकेचा पोस्ट शेअर करत ही पोस्ट लिहिली आहे. "तुमच्या बरोबर झालंय का कधी असं? की एखादं माणूस आपल्या समोर येतं आणि जगात फक्त आपलंच घड्याळ स्लो मोशनमध्ये धावायला लागतं, न्यूटनने लावलेला गुरुत्वाकर्षणाचा शोध फाट्यावर मारून आपण तरंगूच लागतो एकदम.

## जुई संतापली

ठाण्यात मुक्या प्राण्यांच्या ग्रूमिंग सेशन सेंटरमध्ये कर्मचाऱ्याने एका श्वानाला मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. हा व्हिडीओ अनेक प्राणीप्रेमी संस्थांकडून व्हायरल करण्यात आला असून संबंधित कंपनी व कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. पाळीव प्राण्यांची शुश्रूषा करणाऱ्या सेंटरमधील हा धक्कादायक प्रकार पाहून कलाविश्वातील अनेक कलाकारांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. रितेश देशमुख पाठोपाठ अभिनेत्री जुई गडकरीने इन्स्टाग्राम पोस्ट शेअर करत घडल्या प्रकाराबद्दल संताप व्यक्त केला आहे."एका स्पा सेंटरमध्ये श्वानाला कर्मचाऱ्याने मारहाण केल्याचा व्हिडीओ सध्या मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. हा व्हिडीओ अतिशय अस्वस्थ करणारा आहे. मी तो व्हिडीओ पूर्ण पाहू देखील शकले नाही. मारहाण करणाऱ्या त्या मनोरुग्णाला देव चांगलीच शिक्षा करेल...ज्या हातांनी त्याने मुक्या जीवाला मारहाण केली ते हात काही दिवसांत काहीच कामाचे राहणार नाहीत. हा अत्याचार थांबवा, त्या कर्मचाऱ्याला अटक करून कठोर शिक्षा करा. मी आशा करते की, तो श्वान आता सुरक्षित असेल.



## शिवाच्या 'त्या' दृष्यावर नेटकरी चवताळले!

छोट्या पडद्यावर सध्या टीआरपीची जोरदार शर्यत सुरू आहे. 'झी मराठी'ने नुकत्याच दोन नव्या मालिका सुरू केल्या आहेत. पहिल्याच दिवशी तांत्रिक कारणाने प्रसारीत न झालेली मालिका शिवा ही मालिका मंगळवारी प्रसारीत झाली. मात्र, या मालिकेतील एक दृष्य सोशल मीडियावर चर्चेत आले आहे. या दृष्यावर नेटकऱ्यांनी 'झी मराठी'च्या मालिकेला ट्रोल करण्यास सुरुवात केली आहे. विशेष म्हणजे हे दृष्य झी मराठीने आपल्या सोशल मीडिया हँडलवर पोस्ट केले आहे. मालिकेच्या या एपिसोडमध्ये आशुने दिव्याला इम्प्रेस करण्यासाठी हातात विषारी साप पकडल्याचं दाखवलं आहे. वीएफएक्सच्या माध्यमातून हा साप दाखवण्यात आला आहे. मात्र, त्यावर नेटकऱ्यांनी त्याची थट्टा उडवण्यास सुरुवात केली आहे.झी मराठीने पोस्ट केलेल्या शिवा मालिकेतील या दृष्यावर नेटकऱ्यांनी टीकेची झोड उठवण्यास सुरुवात केली आहे. एका युजरने  कार्टून दाखवताय का लहान मुलांना? असा सवाल केला आहे. तर आणखी एका युजरने 'कार्टून पण यापेक्षा चांगल दाखवतात, असे म्हणत मालिकेतील व्हीएफएक्सच्या दर्जावर प्रश्न उपAस्थित केले. एका युजरने 'सातव्या मुलीची सातवी मुलगी'मधला नाग आता झीवरच्या इतर सगळ्या मालिकांमध्ये वापर करणार वाटतं, असे म्हटले. तर, काहींनी जुन्या मालिकाच दर्जेदार असल्याचे म्हटले.  एका युजरने 'काय फालतू मालिका आहे, बंद करा काहीही दाखवतात', अशी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. 'शिवा' ही मालिका ही ओडिया मालिका  'सिंदूरा बिंदू' या मालिकेचा रिमेक आहे. ही मालिका 'मीत' या नावाने हिंदीत प्रसारीत झाली होती.  मात्र, या मालिकेतील एक दृष्य सोशल मीडियावर चर्चेत आले आहे. या दृष्यावर नेटकऱ्यांनी 'झी मराठी'च्या मालिकेला ट्रोल करण्यास सुरुवात केली आहे.



## अमृता देशमुखचं  हळदी कुंकू अन् चर्चा...

अभिनेत्री अमृता देशमुख आणि प्रसाद जवादे यांचा लग्नसोहळा १८ नोव्हेंबर २०२३ रोजी थाटामाटात पार पडला. या जोडप्याच्या लग्नाला जवळच्या नातेवाईकांसह अनेक मराठी कलाकारांनी हजेरी लावली होती. लग्नानंतरचा प्रत्येक सण प्रसाद-अमृता मोठ्या उत्साहाने साजरा करत आहेत. नुकतीच अभिनेत्रीने तिच्या लग्नानंतरच्या पहिल्या हळदी-कुंकू समारंभाची झलक चाहत्यांबरोबर शेअर केली.अमृताने हळदी-कुंकू समारंभासाठी खास पारंपरिक लूक केला होता. गळ्यात नाजूक असा हार, साधं अन् सुंदर मंगळसूत्र, केसात गजरा, नाकात गोलाकार नथ आणि या शृंगाराला शोभेल अशी गुलाबी रंगाची साडी अभिनेत्रीने नेसली होती. याशिवाय अमृताने परिधान केलेलं हल्यावाचं मंगळसूत्र यामध्ये विशेष उठून दिसत होतं.अभिनेत्री ही पोस्ट शेअर करत लिहिते, "घरचं हळदी कुंकू...मी थकुन बसले होते... ही माहेरची साडी आहे. कारण, अखिल भारतीय नाट्य परिषद, जळगाव...यांनी मला ती खास 'खान्देश कन्या' म्हणून भेट दिली आहे. या साडीवर खास ही आगळी वेगळी नथ डिझाइन करून घेतली आहे."दरम्यान, अमृताच्या या सुंदर लूकवर नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. अभिनेत्रीचा हा मराठमोळा लूक प्रत्येकाच्या पसंतीस उतरला आहे. तिचा पती अभिनेता प्रसाद जवादेने देखील बायकोच्या हळदी-कुंकू समारंभातील काही फोटो इन्स्टाग्रामवर शेअर करत तिचं कौतुक केलं होतं.अभिनेत्री अमृता देशमुख आणि प्रसाद जवादे यांचा लग्नसोहळा १८ नोव्हेंबर २०२३ रोजी थाटामाटात पार पडला. या जोडप्याच्या लग्नाला जवळच्या नातेवाईकांसह अनेक मराठी कलाकारांनी हजेरी लावली होती. लग्नानंतरचा प्रत्येक सण प्रसाद-अमृता मोठ्या उत्साहाने साजरा करत आहेत.

# कसोटीसाठी इंग्लंड संघाची घोषणा!

## 4 वर्षांनंतर 'या' वेगवान गोलंदाजाचं संघात पुनरागमन

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारत विरूद्ध इंग्लंड यांच्यातील ५ सामन्यांच्या कसोटी मालिकेत इंग्लिश संघ आघाडीवर आहे. इंग्लंडने पहिल्या कसोटीत भारताचा ५ विकेट्सने पराभव करत १-० अशी आघाडी घेतली. यानंतर आता संघ दुसऱ्या कसोटीसाठी सज्ज झाला आहे. दुसऱ्या कसोटीसाठी इंग्लंडने आपल्या संघाची घोषणा केली आहे. ज्यामध्ये संघाचा स्टार वेगवान गोलंदाज ४ वर्षांनी कसोटी संघात परतला आहे.**

लीड्स कसोटी विजयानंतर २ दिवसांनी इंग्लंड क्रिकेट बोर्डाने मालिकेतील दुसऱ्या सामन्यासाठी आपला संघ जाहीर केला आहे. बेन स्टोक्सच्या नेतृत्त्वाखालील इंग्लिश संघाने भारताविरुद्ध सामन्यात चांगली कामगिरी केली. पण या सामन्यात इंग्लिश संघात अनुभवी गोलंदाजांची कमतरता दिसून आली. आता इंग्लंडचा महत्त्वाचा वेगवान गोलंदाज दुखापतीनंतर संघात परतल्याने संघ अधिक मजबूत झाला आहे. इंग्लंडच्या संघात आता स्टार वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरचे पुनरागमन झालं आहे. गेल्या ४-५ वर्षांपासून विविध दुखापतींशी झुंजणारा स्टार वेगवान गोलंदाज आर्चरला २ जुलैपासून एजबॅस्टन, बर्मिंगहॅम येथे होणाऱ्या दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी संघात स्थान देण्यात आलं आहे.इंग्लंडने आज २६ जूनला ५ कसोटी सामन्यांच्या मालिकेतील दुसऱ्या सामन्यासाठी १५ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. लीड्स कसोटीसाठी संघातून कोणत्याही खेळाडूला वगळण्यात आलेले नाही. फक्त जोफ्रा आर्चरला संघात स्थान देण्यात आलं आहे. आर्चरचे पुनरागमन इंग्लंडच्या गोलंदाजीसाठी मोठा दिलासा देणारं आहे, कारण लीड्स कसोटीच्या दोन्ही डावांमध्ये संघाच्या गोलंदाजीत अनुभवाची कमतरता दिसून आली. दोन्ही डावांमध्ये, टीम इंडियाच्या टॉप आणि मिडल ऑर्डरने मोठी धावसंख्या उभारली होती.उजव्या



हाताचा वेगवान गोलंदाज आर्चर ४ वर्षांहून अधिक काळानंतर पुनरागमन करत आहे. आर्चरने त्याच्या १३ कसोटी सामन्यांच्या कारकिर्दीत ४२ विकेट घेतले आहेत. योगायोगाने, आर्चरने टीम इंडियाविरुद्ध अखेरचा कसोटी सामना खेळला होता.

फेब्रुवारी २०२१ मध्ये भारत दौऱ्यात आर्चरने त्याच्या कारकिर्दीतील १३ वा कसोटी सामना खेळला होता, परंतु काही दिवसांनी त्याला दुखापत झाली आणि त्यानंतर वेगवेगळ्या दुखापतींची मालिका सुरूच राहिली. त्यामुळे कसोटी संघात तो परतू शकला नाही.भारताचा दुसरा कसोटी सामना २ जुलैपासून बर्मिंगहम मध्ये खेळवला जाणार आहे. या सामन्यात आता इंग्लंडच्या गोलंदाजी विभागात वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरला समाविष्ट केलं आहे.लीड्स कसोटी विजयानंतर २ दिवसांनी इंग्लंड क्रिकेट बोर्डाने मालिकेतील दुसऱ्या सामन्यासाठी आपला संघ जाहीर केला आहे.

बेन स्टोक्सच्या नेतृत्त्वाखालील इंग्लिश संघाने भारताविरुद्ध सामन्यात चांगली कामगिरी केली. पण या सामन्यात इंग्लिश संघात अनुभवी गोलंदाजांची कमतरता दिसून आली. आता इंग्लंडचा महत्त्वाचा वेगवान गोलंदाज दुखापतीनंतर संघात परतल्याने संघ अधिक मजबूत झाला आहे. इंग्लंडच्या संघात आता स्टार वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरचे पुनरागमन झालं आहे. गेल्या ४-५ वर्षांपासून विविध दुखापतींशी झुंजणारा स्टार वेगवान गोलंदाज आर्चरला २ जुलैपासून एजबॅस्टन, बर्मिंगहॅम येथे होणाऱ्या दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी संघात स्थान देण्यात आलं आहे.इंग्लंडने आज २६ जूनला ५ कसोटी सामन्यांच्या मालिकेतील दुसऱ्या सामन्यासाठी १५ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. लीड्स कसोटीसाठी संघातून कोणत्याही खेळाडूला वगळण्यात आलेले नाही. फक्त जोफ्रा आर्चरला संघात स्थान देण्यात आलं आहे. आर्चरचे पुनरागमन इंग्लंडच्या गोलंदाजीसाठी मोठा दिलासा देणारं आहे, कारण लीड्स कसोटीच्या दोन्ही डावांमध्ये संघाच्या गोलंदाजीत अनुभवाची कमतरता दिसून आली.

### जोफ्रा आर्चरला समाविष्ट केलं आहे

मिडल ऑर्डरने मोठी धावसंख्या उभारली होती.उजव्या हाताचा वेगवान गोलंदाज आर्चर ४ वर्षांहून अधिक काळानंतर पुनरागमन करत आहे. आर्चरने त्याच्या १३ कसोटी सामन्यांच्या कारकिर्दीत ४२ विकेट घेतले आहेत. योगायोगाने, आर्चरने टीम इंडियाविरुद्ध अखेरचा कसोटी सामना खेळला होता. फेब्रुवारी २०२१ मध्ये भारत दौऱ्यात आर्चरने त्याच्या कारकिर्दीतील १३ वा कसोटी सामना खेळला होता, परंतु काही दिवसांनी त्याला दुखापत झाली आणि त्यानंतर वेगवेगळ्या दुखापतींची मालिका सुरूच राहिली. त्यामुळे कसोटी संघात तो परतू शकला नाही.भारताचा दुसरा कसोटी सामना २ जुलैपासून बर्मिंगहम मध्ये खेळवला जाणार आहे. या सामन्यात आता इंग्लंडच्या गोलंदाजी विभागात वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरला समाविष्ट केलं आहे.

# ICCचे क्रिकेटच्या ६ नियमांमध्ये मोठे बदल

## कसोटीत स्टॉप क्लॉक, 5 धावांचा दंड, सीमारेषेवरील झेल

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अनेक नियमांमध्ये बदल झालेले पाहायला मिळणार आहेत. खरं तर, आयसीसीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटसाठी अनेक नवीन नियम मंजूर केले आहेत. या बदलांमध्ये एकदिवसीय सामन्यांमध्ये ३५ व्या षटकापासून फक्त एकच चेंडू वापरण्याचा नियम समाविष्ट आहे.**

, परंतु याचबरोबर आयसीसीने कसोटी सामन्यांमध्ये स्टॉप क्लॉक नियम लागू केला आहे. तर कॅचच्या नियमांमध्येही बदल करण्यात आला आहे. टी-२० आणि वनडे क्रिकेटमधील नियम येत्या २ जुलैपासून लागू होणार होता. आयसीसीने बदलेल्या नियमांचा सविस्तर आढावा खालीलप्रमाणेटी-२० आणि एकदिवसीय क्रिकेटमध्ये स्टॉप क्लॉक नियम लागू केल्यानंतर एक वर्षानंतर, आता आयसीसीने कसोटीतही तो लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. कसोटीत स्लो ओव्हर रेट ही एक मोठी समस्या आहे. आता आयसीसीच्या नवीन नियमानुसार, क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाला मागील षटक संपल्यानंतर एका मिनिटाच्या आत पुढचे षटक सुरू करावे लागेल. एका मिनिटात जर पुढील षटक सुरू झालं नाही तर त्यांना पंचांकडून दोन वेळा




वॉर्निंग दिली जाईल. त्यानंतरही जर १ मिनिटात षटक सुरू झालं नाही तर प्रतिस्पर्धी संघाला पाच धावांचा दंड आकारला जाईल. ८० षटकांनंतर पुन्हा स्टॉप क्लॉक पुन्हा सुरू होईल. हा नियम २०२५-२७ च्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत लागू करण्यात आला आहे.आयसीसीने चेंडूवर लाळ लावण्यास बंदी घातली आहे परंतु मोठा बदल असा आहे की जर पंचांना चेंडूवर लाळ लावल्याचं निदर्शनास आलं तर तो चेंडू बदलला जाणार नाही. हा बदल यासाठी करण्यात आला आहे की संघांनी चेंडू बदलण्यासाठी जाणूनबुजून चेंडूवर लाळेचा वापर करू नये. आता पंच फक्त तेव्हाच चेंडू बदलतील जेव्हा चेंडूचा आकार बदलला जाईल, जसं की चेंडू खूप ओला असेल किंवा त्यात अतिरिक्त चमक असेल. हा निर्णय पूर्णपणे पंच त्यांच्या विवेकबुद्धीनुसार घेतील. जर पंचांना असं वाटत असेल की लाळेच्या वापरामुळे चेंडूमध्ये फारला बदल होणार नाही, तर चेंडू बदलला जाणार नाही.आयसीसीने डीआरएस प्रोटोकॉलमध्येही मोठा बदल केला आहे.स्पर्श न करता पॅडवर आदळला. झेलबाद रद्द झाल्यानंतर, टीव्ही अंपायर मग दुसऱ्या डिसमिसल मोडची तपासणी करतात, जसं की एलबीडब्ल्यू. पूर्वी, जर झेलबाद नसेल असेल तर एलबीडब्ल्यूचा डिफॉल्ट निर्णय "नाबाद" असायचा. पण नवीन नियमानुसार, जेव्हा LBWसाठी बॉल-ट्रॅकिंग ग्राफिक दाखवले

### फलंदाज बाद झाल्याचे 2 अपील

आयसीसीने पंच आणि खेळाडूंच्या रिव्ह्यूच्या प्रक्रियेतही मोठा बदल केला आहे. म्हणजे पूर्वी टीव्ही पंच प्रथम पंच आणि नंतर खेळाडूंचा रिव्ह्यू विचारात घेत असत परंतु नवीन नियमानुसार जर फलंदाज आधीच बाद झाले असेल तर चेंडू डेड होईल. इतर रिव्ह्यूज अजिबात तपासले जाणार नाहीत. उदाहरणार्थ, जर LBW आणि रन आउटसाठी अपील असेल.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती
। शुक्रवार ।
। दि. 27 जून 2025।

## मोदी सरकारच्या माध्यमातून

# प्रत्येक घटकाला न्याय!

## भारताचा अमृत काळ; भारत संकल्प सभेतून मांडला विकसित भारताचा लेखाजोखा

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भाजपच्या माध्यमातून गेल्या अकरा वर्षांच्या कालखंडात भारताच्या वंचित घटकाला खऱ्या अर्थाने न्याय मिळाला आहे. भारताचा अमृत काळ – सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण यासारख्या अनेक गोष्टींवर मोदी सरकारने यशस्वीपणे कार्य केले.गेल्या ११ वर्षांत देशात घडवून आणलेले ऐतिहासिक बदल, गरिबांच्या सक्षमीकरणासाठी राबवलेल्या योजनांचा आढावा, तसेच "विकसित भारत" या संकल्पाकडून सिद्धीकडे नेणारी ही ११ वर्षे देशासाठी सुवर्णकाळ होते. असे मत भाजप नेते तथा भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांनी मांडले.**




देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारची सेवा ते सूशासन यशस्वी 11 वर्ष या विषयावर आयोजित केलेली विकसित भारत संकल्प सभा प्रभाग क्रमांक नऊ नेहरूनगर इंद्रायणी नगर धावडे वस्ती मंडळाच्या वतीने नेहरूनगर अजमेरा कॉलनी येथे पार पडली. यावेळी मार्गदर्शन करताना आमदार महेश लांडगे बोलत होते.


पिंपरी चिंचवड शहर भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे यांनी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले.

मंडल अध्यक्ष शिवराज लांडगे ,दक्षिण भारतीय आघाडी प्रदेश अध्यक्ष राजेश अण्णा पिल्ले, कामगार आघाडी महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस हनुमंत अण्णा लांडगे, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष विलास मडीगेरी, सरचिटणीस अजय पाताडे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला माजी स्वीकृत नगरसेविका वैशाली खाडे, अल्पसंख्याक आघाडीचे माजी अध्यक्ष फारुख भाई शेख, शिक्षण मंडळाचे माजी सभापती अर्जुन आप्पा ठाकरे, सामाजिक कार्यकर्ते योगेश लोंढे, आशा काळे, छाया वाघिरे, सचिन शिंदे, मंगेश कुलकर्णी, हेमंत शिर्के, मोहन पवार यांच्यासह इतर भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी उपस्थित होते.

> गेल्या अकरा वर्षांमध्ये भारताच्या प्रत्येक घटकाला न्याय मिळाला आहे. नियोजन, शिस्त आणि देशासाठी कटिबद्ध हीच भाजपची नीती आहे. देशात भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून अमुलाग्र बदल घडताना दिसत आहेत. स्थानिक पातळीवर देखील अत्याधुनिक वाहतूक सेवा, प्रशासकीय सेवांचे सक्षमीकरण, पारदर्शक कारभार यातून नागरिकांचे जीवनमान उंचावले आहे. त्यामुळे आगामी काळात भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून स्थानिक पातळीवरील हात बदल घडवून आणायचा आहे.
>
> **–शत्रुघ्न काटे,** अध्यक्ष, भाजपा पिंपरी चिंचवड शहर

> मोदी सरकारने गेल्या ११ वर्षांत अद्वितीय कामगिरी बजावली.या ११ वर्षांतील काळात देशाने 'सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण' यासारख्या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवत प्रगतीचा मार्ग धरला. 'आत्मनिर्भर भारत'या संकल्पनेपासून सुरू झालेला प्रवास आता 'विकसित भारत' या ध्येयाकडे ठामपणे वाटचाल करत आहे.देशाच्या इतिहासातील हा कालखंड सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल.गेल्या दशकातील उल्लेखनीय कामगिरीचे सविस्तर चित्रण करण्यात आले.विविध क्षेत्रांतील महत्त्वपूर्ण निर्णय,योजना आणि त्यांचा सामान्य जनतेवर सकारात्मक परिणाम झाला आहे.
>
> **–महेश लांडगे,** आमदार भोसरी विधानसभा पिंपरी चिंचवड शहर

Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of
Excellence
in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic
Empowering
Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org

# अवघ्या 71 व्या वर्षी पूर्ण केला 'नाट्य अभिनय अभ्यासक्रम'!

**| चिंचवड |**
**प्रतिनिधी : महाईन्यूज |**

**शालेय व महाविद्यालयीन जीवनात 45 वर्षांपूर्वी तीन चौक तेरा, लग्ना आधी वरात, अपराध मीच केला, सूर्याची पिल्ले अशा जवळपास 12 नाटकात अभिनय केला आणि त्यानंतर प्रत्यक्ष जीवनाचे नाट्य सुरू झाल्यामुळे नाटक करण्याला संधीच मिळाली नाही. पण एक दिवस पैस रंगमंच अर्थात थिएटर वर्कशॉप कंपनी चे संचालक प्रभाकर पवार यांची सहज भेट झाली.**



या भेटीत ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्राचा एक वर्षाचा नाट्य अभिनय प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालवितात असे समजले. वय वर्ष अवघे 71 असूनही प्रतिभा शैक्षणिक संकुलाचे मुख्य प्रशासकीय अधिकारी आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व मुक्त विद्यापीठ नाशिक यांचे भूतपूर्व कुलसचिव डॉ. राजेंद्र कांकरिया यांनी एक वर्षांपूर्वी या अभ्यासक्रमासाठी नोंदणी केली. आणि वर्षभरात हा अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला. प्रशिक्षणादरम्यान 'पुनरुत्थान' या नाटकात त्यांनी 'राजा पौरुमिळ' यांची तर परीक्षेच्या सादरीकरणात 'उदवस्त धर्मशाळा' या नाटकातील प्राध्यापक कुलकर्णी यांची भूमिका वठवली. पुण्यातील फिल्म व टेलिव्हिजन इंडियन इन्स्टिट्यूट ( एफ.टी.आय.आय) चे माजी विभागप्रमुख श्री समर नखाते आणि दिल्लीच्या राष्ट्रीय नाट्य विद्यालयाच्या स्नातक रेणू गर्ग यांच्या हस्ते त्यांना नुकतेच प्रमाणपत्र देण्यात आले. त्यांच्या बरोबर रोहन बोरगावकर, राज कदम,संगीता हळनोर आणि शुभम गोळे यांनाही प्रमाणपत्रे देण्यात आली. डॉ. राजेंद्र कांकरिया यांच्याकडे अगोदरच असलेल्या स्नातकाच्या 13 पदव्या आणि अगणित प्रमाणपत्रांमध्ये आणखी एका प्रमाणपत्राची भर पडली एवढाच याचा अर्थ नसून हौसेला मोल नसतं तसं वय ही नसतं हे त्यांनी कृतीतून सिद्ध करून दाखविले, असे उद्गार प्रतिभा शैक्षणिक संकुलाचे संस्थापक-सचिव डॉ. दीपक शहा यांनी त्यांचे अभिनंदन करताना काढले. तसेच प्रतिभा व्यवस्थापन महाविद्यालयांचे संचालक डॉ. सचिन बोरगावे, प्रतिभा महाविद्यालयांच्या प्रभारी प्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी, प्रतिभा शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पोर्णिमा कदम, प्रतिभा कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वनिता कुऱ्हाडे, प्रतिभा इंटरनॅशनल स्कूल च्या मुख्याध्यापिका वृंदा जोशी, तसेच प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांनी त्यांचे अभिनंदन केले. व भावी कारकिर्दीस शुभेच्छा दिल्या .

## गीत, संगीत आणि नृत्याविष्कार असलेल्या तालयात्रेच्या बरसातीने रसिक चिंब

### पंडित भीमसेन जोशी संगीत अकादमीचा वर्धापन दिन सोहळा

**| पिंपरी |**
**प्रतिनिधी : महाईन्यूज |**

पाश्चात्य आणि भारतीय संगीताचा सुरेख संगम साधत पद्मश्री पंडित सुरेशजी तळवलकर यांनी सादर केलेल्या अप्रतिम तालरचनेतून आणि बंदिशीतून रसिक चिंब झाले. तर सुप्रसिद्ध शास्त्रीय गायिका पद्मश्री पद्मजा फेणाणी जोगळेकर यांनी सादर केलेल्या बंदिशीच्या आविष्काराच्या मंगलदीपाने वातावरण उजळून निघाले.

पिंपरी चिंचवड महापालिकेने भारतरत्न पंडित भीमसेन जोशी संगीत अकादमी वर्धापन दिनाचे औचित्य साधून निगडी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात आयोजित केलेल्या बहारदार सोहळ्यास रसिकांनी भरभरून दाद दिली. या वर्धापन महोत्सवाचे उद्घाटन उत्साहात झाले. यावेळी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त पंकज पाटील, निलेश भदाणे, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, सहाय्यक आयुक्त अतुल पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड, क्रीडा अधिकारी रंगराव कारंडे, सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सतीश गोरे, सेवानिवृत्त क्रीडा अधिकारी अनिता केदारी यांच्यासह रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पद्मश्री पंडित सुरेशजी तळवलकर यांच्या तालयात्रा कार्यक्रमाने महोत्सवाची सुरुवात झाली. पाश्चात्य आणि भारतीय संगीताचा सुरेख संगम साधत तालयात्रेच्या माध्यमातून पंडित तळवलकर व त्यांच्या साथीदारांनी रंगमंचावर जणू स्वरांची एक जादुई मैफलच उभी केली होती. तबल्याच्या लयीत मिसळलेली व्हायोलिनची धून, पियानोच्या सुरांवर नृत्य करणारे घटम, आणि प्रत्येक बंदिशीला रसिकांनी टाळ्यांच्या रूपात दिलेल्या आभाळभर शुभेच्छा, या साऱ्यांनी सभागृह भारून टाकले होते. सोहनी रागातील बंदिश 'चलो हटो पिया', तीन ताल राग चंद्रकंस अशा एकामागोमाग येणाऱ्या संगीतमय बंदिशींची रचना म्हणजे जणू भावनांचा प्रवाहच होता, ज्यात उपस्थित प्रत्येक जण आपोआपच चिंब भिजून गेला. तर या बंदिशींवर मौसमी जाजू यांनी कथ्थक नृत्य सादर करीत कार्यक्रमाची उंची वाढवली. भारतीय वाद्यासोबत पाश्चात्य वाद्य वापरून भारतीय संगीताचा तसेच वाद्यांच्या भाषेचा सुंदर आविष्कार या कार्यक्रमाद्वारे श्रोत्यांनी अनुभवला. तालयात्रेमध्ये पंडित सुरेश तळवलकर यांना नागेश आडगावकर (सहगायक), सुरंजन खंडाळकर (सहगायक), अभिषेक शिनकर (हार्मोनियम वादन), पुष्कर भागवत (व्हायोलिन वादन), सावनी तळवलकर (तबला वादन), वेदांग जोशी (तबला वादन), पार्थ भूमकर (पखवाज वादन), अभिषेक भुरूख (ड्रम वादन), ईशान परांजपे (कॅंजोन), ऋतुराज हिंगे (कलाबाश) यांनी साथसंगत केली.





BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Not just education, but
Personality
transformation.
ADMISSIONS OPEN for 2025-26
• CBSE curriculum
• Initiatives like ‘Read-to-Lead’
• Tradition of 100% result
Gayatri English Medium School & Junior College, Charholi
95277 64646 / 77967 67292